## थोडक्यात...

### चाटोरी येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाची विद्यार्थिनी कु. पंकजा इंदोरे हिचे यश

**परभणी -** गंगाखेड तालुक्यातील पडेगाव येथे स्व. रंगराव निरस यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या रंगराव निरस प्रज्ञा शोध परीक्षा (RNTSE) मध्ये स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय, चाटोरीची इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी पंकजा पांडुरंग इंदोरे हिने प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तिने ३०० पैकी २६२ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. बक्षीस वितरण समारंभात प्राचार्य डॉ. आत्माराम टेंगसे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष भावनाताई नखाते, सोलापूरचे उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, डॉ. भरत देवसरकर, संयोजक प्रा. कारभारी निरस यांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र भेटवस्तू व रोख रक्कम देऊन पंकजा इंदोरे हिचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थिनीला तानाजी चंदे , गणेश कदम , मुख्याध्यापक राजेश जोगदंड, धीरज कदम, मोतीराम लांडे तसेच शाळेतील सर्व शिक्षिका यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. संदीप किरडे, सचिव श्री. सचिन जोशी, कोषाध्यक्ष प्रा. सुभाष ढगे व उपाध्यक्ष प्राचार्य डी. बी. पवार यांनी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षक, पालक यांचे अभिनंदन केले.

### राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षांनी अंगणवाडी, प्राथमिक शाळांची केली पाहणी पोषण आहाराचा घेतला आढावा



**परभणी -** राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी परभणी जिल्हयातील विविध अंगणवाडी केंद्रे तसेच प्राथमिक शाळांना भेटी देत शालेय पोषण आहार व अंगणवाडीतील पूरक पोषण आहाराची प्रत्यक्ष पाहणी केली. जिल्ह्यात अन्नसुरक्षा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याबाबत त्यांच्या अध्यक्षतेखाली समितीने शाळा व अंगणवाड्यांची तपासणी करून आढावा घेतला. त्याचप्रमाणे ऊसतोड मजुरांची लहान मुले, गरोदर माता, स्तनदा माता, वीटभट्टी कामगार तसेच बसस्थानक व रेल्वे स्थानक परिसरातील गरजू, भिक्षा मागणाऱ्या महिला व बालकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्याबाबत संबंधित यंत्रणांना स्पष्ट व सखोल सूचना दिल्या. तसेच जिल्ह्यात कोठेही भिक्षा मागणारे नसावे याबाबत देखील शासकीय यंत्रणांनी उपाययोजना कराव्यात याबाबत सूचना देण्यात आल्या.

## युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगाल विधानसभेत प्रचार

### परभणीच्या युवा प्रभाकर ( देवा ) शिंदे यांची पश्चिम बंगाल विधानसभेत प्रचारक पदी निवड



**परभणी-** भाजप युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर (देवा) शिंदे पश्चिम बंगाल विधानसभेत प्रवासी कार्यकर्ता प्रचारक म्हणून प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी मराठवाडा विभागातून निवड केली आहे.हि निवड केल्याबद्दल महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण,राज्य मंत्री मेघना दिदी बोर्डीकर प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे,प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक,जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे मराठवाडा समन्वयक अरुण पाठक, दत्तप्रसाद जाधव यांचे देवा शिंदे यांनी आभार मानले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,आता होत असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील युवा मोर्चाचे पदाधिकारी प्रवासी कार्यकर्ता म्हणून प्रचार करणार आहेत. यामध्ये प्रभाकर (देवा) शिंदे यांची प्रवासी कार्यकर्ता प्रचारक म्हणून त्यांनी निवड केली आहे. या निवडणुकीत युवा मोर्चाचे पदाधिकारी राष्ट्रीय नेत्यांसोबत पश्चिम बंगाल राज्यातील विधानसभा निवडणुकीत प्रचार करणार आहेत.या निवडीबद्दल सर्व स्तरातून युवा नेत्याचे अभिनंदन केले जात आहे.

## संतांच्या चरणी खरे सुख आहे - ह.भ.प.श्रीहरि पितळे महाराज

**(अजहर खान/दै.धर्मयोध्दा)**

**सेलू-** संतसंगतीमुळे आत्मिक सुख आणि ईश्वरभक्तीची गोडी लागते.संतांचे आचरण शुद्ध असते व ते समाजाला योग्य दिशा दाखवतात.संत म्हणजे नैतिक मूल्ये,अढळ ईश्वरभक्ती व माणुसकीची सेवा करणारे थोर पुरुष असतातअसे प्रतिपादन संत बाळाभाऊ महाराज पितळे नरसिंह संस्थानचे (मेहकर) ह.भ.प.श्रीहरि पितळे महाराज यांनी केले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखी रथामागे दिंडी क्रमांक १५ चे मालक वै.ह.भ.प.गुरुवर्य बापूसाहेब महाराज वालुरकर यांच्या ३४ व्या पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्ताने आयोजित कीर्तनात ते बोलत होते.शहरातील समता नगर भागात हा पुण्यतिथी उत्सव (दिनांक मार्च) पार पडला.श्री संतांचिया माथा चरणांवरी । साष्टांग हे करी दंडवत । जगद्गुरू तुकाराम महाराज यांचा हा अभंग सेवेसाठी निवडला. पुढे बोलताना पितळे महाराज म्हणाले की,संतांच्या चरणावर माथा ठेवून त्यांना साष्टांग प्रणिपात करावा.त्यांच्या चरणांचा आश्रय घेतल्यामुळे विश्रांती अर्थात शांतता मिळते.त्यांच्या बोधामृत वाणीने मनात चैतन्य व निवांतपणा येतो.तुमच्याकडून कोणतीही सेवा घडताही पूर्वपुण्याचे फळ केवळ त्यांच्या सहवासामुळे प्राप्त होते. श्रुती संपन्नता व ब्रम्हनिष्ठता याबरोबरच कृपाळुपणा हा संतांचा महत्वाचा गुण असतो.संत नेहमी कृपेचा वर्षाव करतात. ज्यांचा अभाव कोणत्याही काळी सिद्ध होत नाही अशी जी चैतन्यस्वरूप व्यक्ती असते तिलाच संत म्हणतात. निष्काम सेवेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वै.ह.भ.प.गुरुवर्य बापूसाहेब महाराज वालुरकर आहेत.वारकऱ्यांसाठी सकारात्मक ऊर्जे चा स्रोत तसेच शिष्यांच्या प्रगतीसाठी तळमळणारे संयमी थोर पुरुष होते.संत तोची जगी ।क्षमा दया ज्याच्या अंगी ।असे व्यक्तित्व त्यांचे होते. त्यांच्या कीर्तनात भक्तीची गोडी व ज्ञानाची खोली व समाज प्रबोधनाचा संदेश असायचा.संत बाळाभाऊ महाराज पितळे व वै. ह.भ.प.अण्णासाहेब महाराज वालुरकर यांच्या अध्यात्मिक कार्याचा व भेटीचा प्रसंग त्यांनी सांगितला. पुण्यतिथी सोहळ्यासाठी फडातील वारकरी व भाविकांची उपस्थिती होती.

## कोंढुरच्या आयुष पतंगेचा नवोदय परीक्षेत जिल्ह्यात द्वितीय क्रमांक; यशश्री कोचिंगचा पुन्हा एकदा यशस्वी ठसा





**(ज्ञानेश्वर गिरी/ दै.धर्मयोध्दा)**

**कळमनुरी –** तालुक्यातील कोंढुर येथील होतकरू विद्यार्थी आयुष बाबुराव पतंगे याने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करत जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. ग्रामीण भागातून येऊनही जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर आयुषने हे यश मिळवले असून, त्याच्या या कामगिरीमुळे कोंढुर गावासह संपूर्ण कळमनुरी तालुक्याचा मान उंचावला आहे. आयुषने आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, कोंढुर येथे पूर्ण केले. शालेय जीवनापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या आयुषने शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि कुटुंबीयांच्या पाठबळामुळे नवोदय परीक्षेची तयारी केली. त्याच्या या यशामागे त्याचे कठोर परिश्रम आणि योग्य दिशेने केलेली तयारी हे महत्त्वाचे घटक ठरले. या यशामध्ये यशश्री कोचिंग क्लास, कळमनुरी चे संचालक श्री. निलेश पाटील भोयर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी एकूण २ विद्यार्थी नवोदय परीक्षेत पात्र ठरले आहेत. त्यामध्ये आयुष पतंगे याच्यासोबत मयंक प्रवीण तवर हाही विद्यार्थी यशस्वी झाला आहे. निलेश पाटील भोयर सर हे गेल्या काही वर्षांपासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन देत असून, त्यांनी आतापर्यंत एकूण ४८ विद्यार्थ्यांना नवोदय परीक्षेत पात्र करून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण यशामुळे कळमनुरी परिसरात यशश्री कोचिंग क्लासने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आयुष आणि मयंक यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील योग्य मार्गदर्शन आणि मेहनतीच्या जोरावर मोठे यश मिळवू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, गावकऱ्यांसह शिक्षक, पालक आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## परभणी येथे उद्योजक मेळाव्याचे २३ मार्चला आयोजन

**परभणी -** सूक्ष्म व अतिसूक्ष्म उद्योजकांना व्यवसायातील विविध अंगांचा सखोल परिचय व्हावा, ज्ञानवृद्धी घडावी तसेच परस्परांमध्ये नेटवर्किंगची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने दि. २३ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता कमलताई जामकर महिला महाविद्यालय, जिंतूर रोड येथे उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सेल्स व ग्रोथ एक्सपर्टचे राहुल लिमये तसेच सर्व्हाय सोलुशन एलएलपीचे संस्थापक विशाल सरदेशपांडे उद्योजकांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रम विनामूल्य असून इच्छुकांनी लिंकद्वारे https://forms.gle/yET4pFoDPMGNxW8 ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सूक्ष्म व अतिसूक्ष्म उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कौशल्य विकास व रोजगार उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त प्र. सो. खंदारे यांनी केले आहे. "दे आसरा" संस्था आणि राज्याच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्यात २०२५ मध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मेळाव्यात डिजिटल मार्केटिंग, व्यवसायवृद्धीची रणनीती, बाजारपेठेचा अभ्यास, ग्राहकाभिमुख सेवा, स्पर्धात्मक धोरणे, सोशल मीडिया वापर, डिजिटल जाहिरात, ई-कॉमर्स तसेच पीएमईजीपी , मुद्रा, एमएसएमई यांसारख्या शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

## सौ. मिराताई टेंगसे यांचा प्रेरणादायी उपक्रम; पाथरी येथील ओंकार वृद्धाश्रमात महिला दिनानिमित्त किराणा साहित्य वाटप

**(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)**



**पाथरी-** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत पाथरी येथे सौ. मिराताई दादासाहेब टेंगसे (माजी सभापती, कृषी व पशुसंवर्धन, जि.प. परभणी) यांच्या पुढाकारातून एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. दि. ८ मार्चच्या निमित्ताने आज (दि. १७ मार्च) पाथरी येथील ओंकार वृद्धाश्रमात किराणा साहित्याचे वाटप करून महिला दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमातून समाजाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि माणुसकीची जाणीव अधोरेखित झाली. मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर "वाण नाहीतर, तर दान" या संकल्पनेतून सौ. मिराताई टेंगसे गेल्या तब्बल ११ वर्षांपासून सातत्याने हा उपक्रम राबवत आहेत. यंदाही त्यांनी वृद्धाश्रमासाठी आर्थिक मदत तसेच आवश्यक किराणा साहित्य देऊन ही परंपरा जपली. त्यांच्या या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद झळकताना दिसून आला. कार्यक्रमादरम्यान सौ. टेंगसे यांनी वृद्धांशी संवाद साधत त्यांना मानसिक आधार दिला. त्यांनी सांगितले की, अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात सेवा, सहकार्य आणि आपुलकीची भावना अधिक दृढ होते. प्रत्येकाने आपल्या परीने गरजूंना मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी जिजाऊ ब्रिगेडच्या पाथरी तालुकाध्यक्ष शिवकण्या तुकाराम पौळ, शिक्षक सोमनाथ डोंगरे, पंकज बिराजदार, मराठा सेवक तथा अक्षय कॉम्प्युटर्सचे संचालक तुकाराम पौळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच वृद्धांना आपल्या कुटुंबियांसारखे जपणाऱ्या गीताताई सोगे यांच्या सेवाभावाचे विशेष कौतुक करण्यात आले. ओंकार वृद्धाश्रमातील आजी-आजोबांनी या उपक्रमाबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. महिला दिनानिमित्त साजरा करण्यात आलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, सेवाभाव आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक बळकट करणारा ठरला आहे.

## मुंबईतील सर्वधर्मीय इफ्तार सोहळ्यात सदाचार आणि एकतेच्या सामायिक मूल्यांवर प्रकाशझोत



**(दिनेश मराठे/दै.धर्मयोध्दा)**

**मुंबई-** आंतर धर्मीय एकता परिषदेने मुंबईतील मरीन लाइन्स येथील बहाई केंद्रात एका सर्वधर्मीय इफ्तार सोहळ्याचे मंगळवारी सायंकाळी आयोजन केले होते. रमजानच्या पवित्र महिन्यात ज्या काळात ख्रिश्चनांचा लेंन्ट काळ आणि बहाई वर्षाचा समारोप व नवरोजचे आगमन दर्शवणारा बहाई उपवासही सुरू असतो. विविध धर्मांच्या प्रमुखांना एकतेच्या भावनेने एकत्र आणण्याचा हा एक स्तुत्य उपक्रम सफल झाल्याचा आनंद यावेळी बहाई सेंटरच्या सेक्रेटरी नर्गिस गौर यांनी मोठ्या हर्ष उल्हासात व्यक्त केला.

विविध धार्मिक परंपरांमधून आलेल्या वक्त्यांनी उपवासाकडे सदाचार, आत्म -शिस्त, करुणा आणि आध्यात्मिक वाढ जोपासण्याचे एक साधन म्हणून पाहत उपस्थितांचे समोर आपले विचार मांडले.यावेळी अहमदिया पंथाचे शेख नसीर यांनी रमजानकडे संयम आणि मानवतेप्रती जबाबदारीचा मार्ग म्हणून संबोधित केले. फादर एस.एम. मायकल यांनी लेंन्ट काळाला आत्मचिंतन आणि अनासक्तीचा काळ म्हणून अधोरेखित केले; तर स्वामी ब्रज मोहन दास यांनी उपवासावर शरीर, मन आणि वाणीच्या शिस्तीचे एक साधन म्हणून भर दिला, ज्याचा मूळ आधार करुणा आहे. सलीम खान यांनी इस्लाममधील उपवासाला तकवा (ईश्वरनिष्ठा) आणि नैतिक सचोटी विकसित करण्याचा एक मार्ग म्हणून नमूद केले. बहाई समुदायाचे शत्रुघ्न जिवनानी यांनी लोफ्टिनेस महिन्यातील बहाई उपवासाच्या सखोल उद्देशावर भाष्य केले. त्यांनी या काळाचे वर्णन आध्यात्मिक नूतनीकरण, अनासक्ती आणि नवरोजच्या स्वागताची तयारी करण्याचा काळ असे केले. ते म्हणाले, "उपवास ही एक अशी आठवण आहे जी आपल्याला सांगते की, केवळ शारीरिक गरजांच्या पलीकडे जाऊन आत्म्याचे संवर्धन करणे, एकता जोपासणे आणि विनम्रता व प्रेमाने मानवतेची सेवा करणे हाच जीवनाचा उच्च उद्देश आहे."

या सायंकाळच्या कार्यक्रमाचा समारोप इफ्तारने झाला; जो परस्पर सलोखा, सामायिक मानवता आणि सामूहिक आत्मचिंतनाचे प्रतीक ठरला. आंतर धर्मीय एकता परिषदेने आंतर-धर्मीय संवाद आणि सलोखा अधिक दृढ करण्याच्या आपल्या कटिबद्धतेचा याप्रसंगी पुनरुच्चार केला.

## "पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर" लातूर पोलिसांचा अभिनव उपक्रम शेतकऱ्यांच्या जमिनीवरील वादांना जागेवरच सामोपचाराने तोडगा

**(मनोज पाटील/दै.धर्मयोध्दा)**

**लातुर -**जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये शेतजमिनीच्या बांधावरून, शेतरस्त्यांवरून तसेच मालकी हक्कांवरून उद्भवणारे वाद अनेक वेळा गंभीर स्वरूप धारण करतात. अशा वादांमुळे शेतकऱ्यांमध्ये तणाव निर्माण होऊन परस्परविरोधी तक्रारी दाखल होतात व काही वेळा गुन्हेगारी घटनांनाही खतपाणी मिळते. या सर्व प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना पोलीस ठाणे, न्यायालयीन कामकाज यामुळे मानसिक त्रास सहन करावा लागतो आणि न्यायासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींचा अत्यंत संवेदनशीलतेने विचार करून "पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर" हा अभिनव व लोकाभिमुख उपक्रम दिनांक १६ मार्च २०२६ पासून सुरू केला आहे. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेताना एक महत्त्वाची बाब अधोरेखित केली की, "शेतकऱ्यांसाठी त्यांची जमीन ही केवळ मालमत्ता नसून ती त्यांच्या आयुष्याचा आधार, कष्टाचे प्रतीक आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन आहे."शेतीच्या छोट्या-छोट्या कारणांवरून निर्माण होणारे वाद वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात, त्यातून शेजारी शेजाऱ्यांचे संबंध बिघडतात, आणि काही वेळा किरकोळ वाद मोठ्या गुन्ह्यांत परिवर्तित होतात. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी केवळ कायदेशीर कारवाई करण्याऐवजी मानवी दृष्टीकोनातून, संवादातून व सामोपचारातून प्रश्न सोडवण्यावर भर दिला आहे. "पोलीस हे केवळ गुन्हे दाखल करणारे यंत्र नसून समाजातील तणाव कमी करणारे, विश्वास निर्माण करणारे आणि गरजूंना आधार देणारे माध्यम असावे" या विचारातूनच या उपक्रमाअंतर्गत संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदार हे थेट गावामध्ये जाऊन वादग्रस्त शेतजमिनीवर भेट देत आहेत. दोन्ही पक्षकारांना समोरासमोर बसवून, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करून, महसूल विभागाच्या नोंदींचा आधार घेत, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, तंटामुक्ती समिती सदस्य , ज्येष्ठ व्यक्ती , मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक इत्यादी यांच्या उपस्थितीत पारदर्शक व न्याय्य पद्धतीने तोडगा काढला जातो. या उपक्रमाअंतर्गत आज दिनांक १७ मार्च रोजी पोलीस ठाणे लातूर ग्रामीण पोलीस निरीक्षक श्री अरविंद पवार यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. डोंगरे यांनी मौजे भातखेडा येथे प्रत्यक्ष भेट देऊन मागील चार वर्षांपासून प्रलंबित असलेला शेतीच्या जागेचा वाद सामोपचाराने निकाली काढला. अर्जदार शिवराज धोंडीराम आचवले यांच्या सुमारे ४ वर्षे जुने शेतीच्या सीमारेषेबाबत तंटा पोलीसांनी दोन्ही पक्षकारांना एकत्र बसवून त्यांच्या जमिनीचे दस्त तपासले. त्यानंतर गावातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत प्रत्यक्ष शेतावर जाऊन मोजमाप करण्यात आले. पारदर्शक पद्धतीने सीमारेषा निश्चित करण्यात आली व दोन्ही पक्षकारांनी परस्पर सहमतीने वाद कायमस्वरूपी मिटवला. दोन्ही पक्षकारांनी भविष्यात कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण करणार नसल्याचे मान्य करून पोलीस प्रशासनाबद्दल समाधान व्यक्त केले. "पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर" हा उपक्रम लातूर जिल्हा पोलिसांच्या लोकाभिमुख व विश्वासार्ह पोलिसिंगचा उत्कृष्ट नमुना असून या माध्यमातून शेतकऱ्यांना केवळ न्याय मिळत नाही, तर त्यांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होत आहे. हा उपक्रम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणार असून, तक्रारी असलेल्या गावांना प्राधान्य देऊन पोलीस पथके तसेच संबंधित गावाचे मंडळ अधिकारी, तलाठी व इतर महसूल प्रशासनाची संबंधित व्यक्ती, गावातील तंटामुक्ती तसेच प्रतिष्ठित व्यक्ती असे मिळून सदर ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देणार आहेत. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले शेती व जमिनीचे वाद सामोपचाराने निकाली काढण्यावर भर देण्यात येणार आहे. नागरिकांना आवाहन. शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी संदर्भातील वाद वाढण्यापूर्वीच पोलीस प्रशासनाकडे मांडावेत. परस्पर सहमतीने व कायदेशीर मार्गाने वाद मिटविण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस सदैव तत्पर आहेत.

## उज्वल यशाची अखंडीत परंपरा! जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत जि प प्रा शा देवनांद्रा साकाप तालुका पाथरी शाळेचे घवघवीत यश



**(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी-** सन २०२६-२७ वर्षासाठी घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत जि प प्रा शा देवनांद्रा साकाप शाळेचे चार विद्यार्थी पात्र झाले आहेत. यामध्ये अर्णव विनोद जुकटे,आदित्य बाबुराव गायकवाड, गौरव रामेश्वर सत्वधर व श्रेयस शामसुंदर बगाटे हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत. तसेच हे चारही विद्यार्थी सैनिकी स्कूल साठी पात्र ठरले आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये या शाळेने गुणवत्तेचा आलेख कायम व वाढता ठेवलेला असून मागील पाच वर्षात या शाळेचे २५ विद्यार्थी जवाहर नवोदय प्रवेश पात्र व ४५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी आदर्श शाळा म्हणून या शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. शाळेच्या या गुणवत्ता पूर्ण कार्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक महिपाल ,प्रभारी मुख्याध्यापक भागवत , मार्गदर्शक शिक्षक पोपळघट ,झांजे ,रोकडे ,कोळपे व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बळीराम गायकवाड व सर्व पदाधिकारी यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी राठोड व केंद्रप्रमुख सानप सर यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao